अहिल्यानगर | बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ | वर्ष ७ वे | अंक ५८ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

।। श्री ।।

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे



## SPOT NEWS

### राज्यात तीन अतिरिक्त माहिती आयुक्तांची नियुक्ती

**नवी दिल्ली** – राज्य माहिती आयोगाकडे प्रलंबित असलेल्या अपिलांचा जलद निपटारा करण्यासाठी बृहन्मुंबई, नाशिक आणि अमरावती खंडपीठांमध्ये तीन वर्षांच्या कालावधीसाठी तीन अतिरिक्त राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार, प्रत्येक खंडपीठासाठी एक उप सचिव आणि एक कक्ष अधिकारी अशी प्रतिनियुक्तीवरील पदे निर्माण करण्यात येणार आहेत. तसेच एक लघुलेखक, एक लिपिक–टंकलेखक आणि एक शिपाई ही पदे बा यंत्रणेमार्फत कंत्राटी पद्धतीने भरली जाणार आहेत. अशाप्रकारे तीनही खंडपीठांसाठी एकूण १८ पदे निर्माण करण्यात येणार आहेत. प्रलंबित अपिलांची संख्या कमी झाल्यास आवश्यकतेनुसार अतिरिक्त राज्य माहिती आयुक्तांना इतर खंडपीठांमध्ये नियुक्त करण्याचे अथवा काही द्वितीय अपीले त्यांच्या कार्यक्षेत्रात हस्तांतरित करण्याचे अधिकार राज्य मुख्य माहिती आयुक्तांना देण्यात आले आहेत. बा यंत्रणेमार्फत पदे भरताना वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात येणार आहे.

### शेतकरी अपघात योजनेला आणखी तीन वर्षांची मुदतवाढ

**मुंबई** – गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेस आणखी तीन वर्षांची मुदतवाढ देण्यास तसेच या योजनेत पात्र भूमिहीन शेतमजूर व महिला शेतक–यांचा समावेश करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. यापूर्वी ही योजना कुटुंबातील दोनच सदस्यांना लागू होती, आता ही योजना शेतक–यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना लागू होणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. अपघातग्रस्त शेतकऱ्यांस किंवा त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता राज्यातील सर्व शेतकरी व खातेदार म्हणून नोंद असलेल्या शेतकरी कुटुंबाला लाभ होतो.

# जायकवाडी धरणाचे १८ दरवाजे उघडले

## गोदावरीत १० हजार क्युसेक विसर्ग सुरु । सलग चौथ्या वर्षी पाणी सोडण्याची वेळ; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**पैठण । वीरभूमी–**

मराठवाड्याची जीवनदायिनी असलेल्या जायकवाडी धरणाने अखेर पूर्ण क्षमतेचा टप्पा गाठल्यानंतर मंगळवारी (दि. ४) सायंकाळी ६.११ वाजता धरणाचे १८ दरवाजे अर्धा फूट उघडून गोदावरी नदीपात्रात १० हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. जायकवाडी धरणाच्या इतिहासात दरवाजे उघडण्याची ही १७ वी वेळ असून सलग चौथ्या वर्षी धरणातून पाणी सोडण्याची वेळ आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून नाशिक, अहिल्यानगर तसेच जायकवाडीच्या विस्तीर्ण पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार पावसामुळे धरणात मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक सुरू होती. त्यामुळे धरण अल्पावधीतच पूर्ण क्षमतेने भरल्याने जलसंपदा विभागाने नियंत्रित स्वरूपात पाण्याचा विसर्ग करण्याचा निर्णय घेतला.

कार्यकारी संचालक (गोदावरी विकास महामंडळ) जयंत गवळी, नामदेवराव खराद, कार्यकारी अभियंता गणेश हसे आणि राजेंद्र धोडपकर यांच्या हस्ते विधीवत पूजन करून धरणाचे दरवाजे उघडण्यात आले. यावेळी उपविभागीय अभियंता श्रद्धा निंबाळकर, धरण अभियंता तंत्रज्ञ गणेश खराडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील, पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्यासह जलसंपदा विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

धरणाचे १० ते २७ क्रमांकाचे एकूण १८ दरवाजे प्रत्येकी अर्धा फूट उचलण्यात आले असून प्रत्येक दरवाजातून सुमारे ५२० क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे गोदावरी नदीपात्रात एकूण १० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. विसर्ग सुरू करण्यापूर्वी धरण परिसरातील सर्व यंत्रणेची तपासणी करण्यात आली तसेच नदीपात्रात पाणी सोडण्यापूर्वी इशारा देणारा सायरनही वाजविण्यात आला.

मंगळवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या नोंदीनुसार धरणात ९१.६२ टक्के जिवंत पाणीसाठा उपलब्ध होता. धरणाची पाणीपातळी १५२०.४६ फूट (४६३.४३६ मीटर) इतकी नोंदविण्यात आली. त्याचवेळी धरणात ४३ हजार ३०१ क्युसेक वेगाने पाण्याची आवक सुरू होती. उजव्या कालव्यातून १ हजार क्युसेक, तर डाव्या कालव्यातून ७०० क्युसेक असा एकूण १ हजार ७०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू होता. वाढत्या आवकेमुळे धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने अखेर दरवाजे उघडण्याचा निर्णय घेण्यात आला.

यंदाच्या पावसाळ्यात जायकवाडी धरण अपेक्षेपेक्षा लवकर भरल्याने मराठवाड्याच्या पिण्याच्या पाण्याची, सिंचनाची आणि औद्योगिक वापराची मोठी चिंता दूर झाली आहे. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

दरम्यान, धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत असल्याने गोदावरी नदीतील पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी नदीपात्रात जाणे टाळावे, जनावरे व साहित्य सुरक्षित स्थळी हलवावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार आणि जायकवाडी धरण प्रशासनाने केले आहे.

जायकवाडी धरणाचे दरवाजे आतापर्यंत इतिहासात १७ वेळा उघडण्यात आले आहेत. विशेष म्हणजे सलग चौथ्या वर्षी धरण पूर्ण क्षमतेने भरून गोदावरी नदीत पाण्याचा विसर्ग करण्याची वेळ आली आहे.

# गुंगी गुडिया वरून काँग्रेस-राष्ट्रवादीत जुंपली

**मुंबई । वीरभूमी–**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर काँग्रेसने गुंगी गुडिया अशी टीका केल्यामुळे दोन काँग्रेसमध्ये संघर्षाची ठिणगी पडली आहे. या टीकेमुळे संतापलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी प्रदेश प्रवक्ते सूरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी कुलाबा येथील काँग्रेसच्या गांधी भवन कार्यालयात घुसून जोरदार घोषणाबाजी केली. ठाण्यातही राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेला काळे फासले. सपकाळ यांनी मात्र टीकेचे समर्थन करताना ही टीका मान्य नसेल तर आपण गुंगी गुडिया नाही हे त्यांनी सिद्ध करावे असे आव्हान दिले आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या बीड दौऱ्यातील एक व्हीडीओ काँग्रेसने सोशल मीडियावर शेअर केला होता. या व्हीडीओमध्ये पत्रकार परिषदेत उपमख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पत्रकार प्रश्न विचारत असताना राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे हे पत्रकारांना प्रश्न विचारण्यापासून रोखत असल्याचे दिसत आहे. यावरून सुनेत्रा पवार अजून किती दिवस गुंगी गुडिया बनून राहणार? असा सवाल काँग्रेसने उपस्थित करत त्यांना लक्ष्य केले होते. या पोस्टवर राष्ट्रवादी काँग्रेसने तीव्र आक्षेप घेत तो महिलांचा अवमान असल्याचा आरोप करत आक्रमक भूमिका घेतली. दरम्यान, मंगळवारी दुपारी २ वाजता गांधी भवनात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषद सुरू असतानाच सूरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीचे कार्यकर्ते कार्यालयात घुसले. यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधात घोषणाबाजी करत सुनेत्रा पवार यांची जाहीर माफी मागण्याची मागणी केली. तसेच सपकाळ यांच्याकडे या पोस्टबाबत जाब विचारण्याचाही प्रयत्न केला. यावेळी दोन्ही पक्षांचे समर्थक आमने सामने आल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती.

महिलांना कमी लेखण्याची काँग्रेसची वृत्ती आहे का, याचे उत्तर त्यांनी द्यावे, असे आव्हान देत सुनेत्रा पवार यांच्या कामामुळे काँग्रेस अस्वस्थ झाली असून गुंगी गुडियासारखा अपमानास्पद शब्द वापरणे ही काँग्रेसच्या घसरलेल्या वैचारिक पातळीचे द्योतक आहे अशी टीका सुरज चव्हाण यांनी केली. काँग्रेसने सुनेत्रा पवार यांची माफी न मागितल्यास राज्यभरात राष्ट्रवादीचे कार्यकर्ते काँग्रेस कार्यालयात घुसून जाब विचारतील असा इशारा त्यांनी दिला.

# करंजी घाटात चेन स्नॅचिंगच्या घटनेने खळबळ

## दुचाकी अडवून महिलेचे ७० हजारांचे सोन्याचे मनीमंगळसूत्र हिसकावले

**पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी तालुक्यातील करंजी घाटात पुन्हा एकदा रस्तालुटीची घटना घडल्याने दुचाकीवर प्रवास करणाऱ्या व सर्व सामान्य नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.



करंजी घाटातील पीरबाबा परिसरात भररस्त्यात दुचाकी अडवून अज्ञात तिघा चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सुमारे ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून नेल्याची घटना शनिवारी (१ ऑगस्ट) रात्री साडेदहाच्या दरम्यान घडली. या प्रकरणी भिंगार येथील महिलेने पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादी रंजना सुनील पवार (वय ४०, रा. महेशनगर, भिंगार, ता. व जि. अहिल्यानगर) या आपल्या पती सुनील पवार यांच्यासह टीव्हीएस आयक्यूब (एमएच–१६ डीई–९२०८) या दुचाकीवरून पाथर्डी तालुक्यातील शिरापूर येथे आजारी आजोबांची भेट घेऊन परत भिंगारकडे निघाल्या होत्या. रात्री सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास करंजी घाटातील पीरबाबा दर्ग्याजवळील वळणावर मागून तिघेजण एका दुचाकीवर आले. त्यांनी पवार दाम्पत्याची दुचाकी अडवली. त्यापैकी एकाने काळ्या रंगाचे जॅकेट तर दुसऱ्याने तोंडावर पांढऱ्या रंगाचा गमछा बांधला होता. तुम्ही आम्हाला कट मारून आला असे म्हणत त्यांनी वाद घालत दुचाकी थांबवली. त्यानंतर मागे बसलेल्या महिलेच्या गळ्यातील सुमारे ९ ग्रॅम वजनाचे, ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मनी मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून तिघेही करंजी गावाच्या दिशेने पसार झाले.

या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून भररस्त्यात झालेल्या या धाडसी चोरीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून संबंधित पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, अज्ञात तिघा आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

# दानचोरीवरुन संसदेत गदारोळ सुरूच

**नवी दिल्ली । वीरभूमी–**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या १२ व्या दिवशी राम मंदिरातील दानपेटीतील रक्कम चोरीला गेल्याच्या मुद्द्यावरून दोन्ही सभागृहांमध्ये मोठा गदारोळ झाला. मंगळवारी लोकसभेचे कामकाज केवळ १९ मिनिटे चालले. या काळात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कर सुधारणांशी संबंधित विधेयके मांडली. त्यानंतर सभागृहाचे कामकाज बुधवारपर्यंत तहकूब करण्यात आले.

राज्यसभेचे कामकाज दिवसभरात दोनदा तहकूब करण्यात आले. सकाळी ११ वाजता कामकाज सुरू झाल्यानंतर अर्ध्या तासाच्या आतच ते तहकूब करावे लागले. दुपारी १२ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले. परंतु ते केवळ २० मिनिटे चालले. त्यानंतर दुपारी २ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले. तत्पूर्वी, राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्यात खडाजंगी झाली. खर्गे यांनी सांगितले की, राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची स्थापना केंद्र सरकारने केली होती आणि सरकारनेच या ट्रस्टला ७० एकरांहून अधिक जमीन हस्तांतरित केली होती. त्यांनी नमूद केले की, राम मंदिराशी संबंधित प्रत्येक कार्यक्रमात खुद्द पंतप्रधान सहभागी झाले होते. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, आता ईडी, सीबीआय आणि इतर केंद्रीय तपास यंत्रणा कुठे आहेत, सरकारने यावर सभागृहात उत्तर दिले पाहिजे, असा आग्रह धरला.

याला उत्तर देताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, काँग्रेस आणि समाजवादी पक्षाने काळ्या पट्ट्या बांधून राम मंदिराच्या बांधकामाला विरोध केला होता. ते म्हणाले की, जे लोक पूर्वी विरोधात होते, तेच लोक आज मगरीचे अश्रू ढाळून देशाला दिशाभूल करू शकत नाहीत. सरकारकडे उत्तरे मागण्यापूर्वी त्यांनी प्रभू रामाचा अपमान केल्याबद्दल आधी देशाची माफी मागावी.

लोकसभेचे कामकाज सुरू होताच दुपारी २ वाजता विरोधी पक्षाचे खासदार जागेवरून उठले आणि घोषणाबाजी करू लागले. पीठासीन अधिकारी दिलीप सैकिया यांनी खासदारांना घोषणाबाजी न करता आपापल्या जागांवर बसण्याची विनंती केली. या गोंधळातच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कर आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक सादर केले.

### दान चोरी प्रकरणाचा विरोधकांकडून निषेध

राम मंदिरातून दान–अर्पण चोरीला गेल्याच्या मुद्द्यावरून काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि राष्ट्रीय जनता दल यांसारख्या विरोधी पक्षांच्या खासदारांनी सरकारचा निषेध केला. राम मंदिरासाठीच्या अर्पणाची चोरी झाल्याचे निदर्शनास आणून देण्यासाठी समाजवादी पक्षाच्या खासदार डिंपल यादव यांनी पक्षाच्या इतर खासदारांसह संसद परिसरात दानपेटी घेऊन आंदोलन केले.

### चंदा चोरीवर उत्तर द्या

राज्यसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले की, राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट विरोधात रोख रक्कम, देणग्या, दागिने आणि जमीन यांबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. सरकारने सभागृहात उत्तर दिले पाहिजे.



# SPOT NEWS

## संभाजी ब्रिगेडच्या जिल्हा संपर्क प्रमुखपदी इंजि. शामभाऊ जरे

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**



संभाजी ब्रिगेड पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला बळकटी देण्यासाठी श्रीगोंदा तालुकाध्यक्ष इंजि. शामभाऊ जरे यांची अहिल्यानगर जिल्हा संपर्कप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. अहिल्यानगर येथे झालेल्या कार्यक्रमात प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाध्यक्ष राजेश दादा परकाळे यांच्या हस्ते जरे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. इंजि. जरे यांनी श्रीगोंदा तालुक्यात सामाजिक, संघटनात्मक व जनहिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने काम केले आहे. रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, युवकांचे प्रश्न तसेच प्रशासनातील पारदर्शकतेसाठी त्यांनी आंदोलने, मोर्चे, धरणे व निवेदनांच्या माध्यमातून पाठपुरावा केला आहे. त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर जिल्हा संपर्कप्रमुखपदाची जबाबदारी सोपविली आहे. नियुक्तीनंतर जरे यांनी पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवून संघटना अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## अहिल्यानगरसह राज्यभर सिमेंटच्या शेतरस्त्यांचे जाळे उभारणार : शरद पवळे

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतीपर्यंत दर्जेदार सिमेंटचा शेतरस्ता पोहोचविण्याचा संकल्प महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने केला असून, अहिल्यानगरसह संपूर्ण राज्यात सिमेंटच्या शेतरस्त्यांचे जाळे उभारण्यासाठी व्यापक जनजागृती, मार्गदर्शन आणि प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी दिली. अहिल्यानगर तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या राज्यव्यापी शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण व 'मिशन झिरो पेण्डन्सी' अभियानाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अभियानात मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवत शेतरस्त्यांशी संबंधित विविध समस्या, अडचणी आणि प्रलंबित प्रकरणे मांडली. यावेळी बोलताना शरद पवळे म्हणाले की, राज्यातील हजारो शेतकरी आजही शेतरस्त्याअभावी स्वतःच्या शेतीपर्यंत सहज पोहोचू शकत नाहीत. अनेक सुपीक जमिनी केवळ रस्त्यांच्या अभावामुळे पडिक राहिल्या आहेत. शेतरस्त्यांशी संबंधित अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रशासकीय कार्यालयांमध्ये प्रलंबित असून, काही ठिकाणी चुकीच्या निर्णयांमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळ सातत्याने संघर्ष करत असल्याचे त्यांनी सांगितले. या अभियानाला शरद पवळे, आशिष कासार, बाळासाहेब थोरात, पोपट शेळके, अक्षय जगताप, सचिन शेळके, सोमनाथ तोडमल, गणेश इंगळे, एकनाथ पवार, रामदास तनपुरे, विठ्ठल मिसाळ, दादासाहेब शिरसाठ, गोवर्धन शिरसाठ, कृष्णा चव्हाण, राजेंद्र शिरसाठ, जालिंदर आठरे, राहुल गट, आंबादास आव्हाड, विक्रांत कासार यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## एमआयडीसीत बोगस कचरा वेचकांच्या नावाखाली संशयितांचा वावर; चौकशीची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

एमआयडीसी व नागापूर परिसरात बोगस कचरा वेचक असल्याचे भासवत परप्रांतीय तसेच बाहेरून येणाऱ्या संशयित व्यक्तींचा वाढता वावर चिंतेचा विषय बनला असून, अशा व्यक्तींची सखोल चौकशी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगरच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत शिवाजी थोरात यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांच्यासह शकुंतला वाघमारे, इंदुबाई कटे, शारदा फजगे, ताराबाई जगधने, मंगल चांदणे आदी एमआयडीसी व नागापूर परिसरातील स्थानिक कचरा वेचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे कचरा संकलनाचे काम करणाऱ्या स्थानिक कचरा वेचकांच्या सुरक्षेचा, सन्मानाचा आणि रोजगाराचा प्रश्न या निवेदनातून उपस्थित करण्यात आला. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा, सुरक्षित वातावरणात उपजीविका करण्याचा तसेच कायद्यापुढे समान संरक्षण मिळण्याचा अधिकार दिला आहे. महाराष्ट्र पोलीस दल नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण, कायदा व सुव्यवस्था राखणे आणि गुन्हेगारीला आळा घालण्याचे महत्त्वाचे कार्य करत असल्याने या प्रकरणात निष्पक्ष चौकशीची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. फिरणाऱ्या संशयित व्यक्तींची सखोल चौकशी करण्यात यावी, त्यांच्या ओळखपत्रांची, आधार कार्ड, रेशनकार्ड व इतर कागदपत्रांची पडताळणी करण्यात यावी, चोरी, लूटमार, मारहाण किंवा इतर गुन्ह्यांमध्ये सहभागी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, स्थानिक व प्रामाणिक कचरा वेचकांची बदनामी होणार नाही आणि त्यांचा रोजगार सुरक्षित राहील, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात व गरज भासल्यास स्थानिक कचरा वेचकांची अधिकृत नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्यासाठी संबंधित विभागाशी समन्वय साधण्याची मागणी करण्यात आली आहे.

# जनोपकारार्थ बांधलेल्या अकोळनेरच्या बारवेचा शिलालेख

**१७८२ साली बांधलेल्या बारवेवर सईबाई पोहेकरी यांच्या दातृत्वाची ऐतिहासिक नोंद**

■ **विजय उंडे**

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर तालुक्यातील अकोळनेर गावातील श्रीकृष्ण मंदिराजवळील बारवेवर कोरलेला अठराव्या शतकातील शिलालेख आजही तत्कालीन जलव्यवस्थापन, दानपरंपरा आणि स्त्रियांच्या समाजोपयोगी कार्याची साक्ष देत आहे. शके १७०४ अर्थात इ.स. १७८२ मध्ये सईबाई पोहेकरी यांनी जनोपकारार्थ ही वापी (बारव) बांधून पूर्ण केल्याची नोंद या शिलालेखात आढळते.

हा पाच ओळींचा कोरीव शिलालेख देवनागरी लिपीतील मराठी भाषेत असून, काळाच्या ओघात अक्षरे मोठ्या प्रमाणात झिजली आहेत. अथक प्रयत्नांनंतर शिलालेखाचे वाचन करण्यात आले असून त्यातून अकोळनेरच्या तत्कालीन सामाजिक व धार्मिक जीवनावर महत्त्वपूर्ण प्रकाश पडतो.

शिलालेखाचे वाचन :

१. ।। श्री ।।
२. ।। श्री गुरूचे चेरणी तत्पर सईबाई पोहेकरी ।।
३. ।। मु कसबे आंकूळनेर नृप शालिवाहन सके ।।
४. ।। १७०४ शुभक्रुती नाम संवछर जेस्ठ शु १२. ।।
५. ।। तेदीने जनोपकारार्थ हि वापी का समाप्त.।।



शिलालेखाच्या नोंदीनुसार, शालिवाहन शक १७०४, शुभकृत नाम संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध द्वादशी, म्हणजेच २२ जून १७८२ रोजी सईबाई पोहेकरी यांनी जनोपकारार्थ बारव बांधून पूर्ण केली. 'श्री गुरूचे चेरणी तत्पर' या उल्लेखातून त्यांच्या धार्मिक श्रद्धेची, तर 'जनोपकारार्थ' या शब्दातून लोककल्याणाची भावना स्पष्ट होते.

या शिलालेखाचे विशेष महत्त्व म्हणजे सार्वजनिक जलसुविधा निर्माण करणाऱ्या एका स्त्रीचे नाव स्पष्टपणे इतिहासात नोंदले गेले आहे. त्यामुळे मराठाकालीन काळातील स्त्री-दानशूरता, धार्मिक श्रद्धा आणि समाजोपयोगी कार्य यांचा संगम या शिलालेखातून दिसून येतो. तसेच 'कसबे अकोळनेर' असा उल्लेख असल्याने त्या काळातील अकोळनेरच्या महत्त्वावरही प्रकाश पडतो.



■ छाया । विजय उंडे

बारव ही तत्कालीन ग्रामीण जीवनातील अत्यंत महत्त्वाची जलसुविधा होती. त्यामुळे सईबाई पोहेकरी यांनी उभारलेली ही वापी केवळ धार्मिक पुण्यकर्म नव्हे, तर गावकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविणारे लोकहिताचे कार्य होते. आजच्या जलसंवर्धनाच्या दृष्टिकोनातूनही हा वारसा महत्त्वपूर्ण ठरतो.

या शिलालेखाचे वाचन, माहिती, संशोधन पुणे येथील अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे तर त्यांना संशोधन कार्यात डॉ. शैलेंद्र भंडारे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

# विहीर अनुदानापासून वंचित शेवगाव तालुक्यातील गावांचे फेरसर्वेक्षण करा

**डॉ. क्षितिज घुले यांची भूजल सर्वेक्षण विभागाकडे मागणी**

● **शेवगाव । वीरभूमी –**

शेवगाव तालुक्यातील विहीर अनुदान योजनांपासून वंचित राहिलेल्या गावांचे तातडीने फेरसर्वेक्षण करून त्यांचा योजनेंतर्गत समावेश करावा, अशी मागणी पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. क्षितिज घुले यांनी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, अहिल्यानगर येथील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, राज्य शासनाच्या विविध विहीर अनुदान योजनांचा लाभ मिळण्यासाठी भूजल सर्वेक्षण आवश्यक आहे. यापूर्वीच्या सर्वेक्षणात शेवगाव तालुक्यातील ६७ गावांचा समावेश करण्यात आला असला, तरी अनेक गावांचा अद्याप समावेश झालेला नाही. त्यामुळे त्या गावांतील पात्र शेतकरी शासनाच्या महत्त्वाच्या योजनांपासून वंचित राहत आहेत.

तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना समान संधी मिळावी, यासाठी उर्वरित सर्व गावांचे तातडीने फेरसर्वेक्षण करून त्यांचा विहीर अनुदान योजनांमध्ये समावेश करावा, अशी मागणी डॉ. घुले यांनी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर तसेच गटविकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. उर्वरित गावांचे सर्वेक्षण लवकर पूर्ण झाल्यास अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या विहीर अनुदान योजनांचा लाभ मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा डॉ. घुले यांनी व्यक्त केली आहे.

# पाल्यांशी मित्रत्वाचे नाते जोपासा

**डॉ. राणीताई काटे । चापडगाव विद्यालयात माता-पालक मेळावा**

● **शेवगाव । वीरभूमी–**

प्रत्येक मातांनी आपल्या पाल्यांच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावत त्यांच्याशी मित्रत्वाचे नाते निर्माण करावे, असे प्रतिपादन डॉ. राणीताई काटे यांनी केले. त्या चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित माता-पालक मेळाव्यात बोलत होत्या.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती उषाताई बिडे होत्या. यावेळी प्राचार्य संपत दसपुते, उपप्राचार्य सुनील जायभाये, वत्सला जाधव, अश्विनी अकोलकर, विद्यावर्धिनी मुळे, जिजाबाई काळे, सरिता काळे, प्रतीक्षा नाचन, अलका शिंदे, योगिता मडके, ज्योती पालवे आदी उपस्थित होते.

डॉ. काटे म्हणाल्या, मुलांना सकस आहार द्यावा, आहारात मोड आलेल्या कडधान्यांचा समावेश करावा आणि स्वच्छतेच्या सवयी लावाव्यात. पालकांनी मुलांच्या आरोग्याबरोबरच मानसिक विकासाकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मेळाव्यात पालकांनी विविध समस्या मांडल्या. त्यावर उत्तर देताना प्राचार्य संपत दसपुते म्हणाले, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि त्यांना सक्षम नागरिक बनविणे हेच विद्यालयाचे प्रमुख ध्येय आहे. पालकांनी मुलांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, त्यांच्या मित्रपरिवारावर लक्ष ठेवावे आणि इतर मुलांशी तुलना टाळावी.

यावेळी ज्येष्ठ शिक्षिका वत्सला जाधव आणि विद्यावर्धिनी मुळे यांनीही मनोगत व्यक्त करत पालकांच्या प्रश्नांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अध्यक्षीय सूचना विद्यावर्धिनी मुळे यांनी केल्या, तर आभार अश्विनी अकोलकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# संस्थेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिक्षकाचे योगदान मोलाचे

**सतीश गुगळे । श्री तिलोक जैन विद्यालयातील पर्यवेक्षक अशोक गर्जे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार**

● **पाथर्डी । वीरभूमी –**

शिक्षक सुद्धा आयुष्यभर विद्यार्थीच असतो. संस्थेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिक्षकाचे योगदान मोलाचे ठरत असले तरी यशामध्ये मात्र सर्वांचा सहभाग असतो. यशापर्यंत पोहोचण्याची साखळी अनंत अडचणी पार करते, तेव्हा कुठे यश मिळते. श्री तिलोक जैन विद्यालय ही संस्था सेवाभावी कर्मचाऱ्यांवर ओळखली जाते. संस्थेची अशी सर्वात मोठी ओळख कौतुकास्पद आहे, असे मत श्रीलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे यांनी व्यक्त केले.

विद्यालयातील मराठीचे शिक्षक तथा पर्यवेक्षक अशोक गर्जे यांच्या सेवापुर्ती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश कुचेरिया, राजेंद्र मुथा, संपत गांधी, अनिल गुगळे, प्राचार्य अजय भंडारी, गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड, आदींसह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विविध संस्था व मान्यवरांच्या हस्ते गर्जे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना सतीश गुगळे म्हणाले, शंभर वर्षांहून अधिक काळाची तपश्चर्या संस्थेच्या यशाला व नावलौकिकाला कारणीभूत जशी आहे, तशी सर्वच कर्मचाऱ्यांची प्रामाणिक सेवा सुद्धा करणीभूत आहे. जबाबदारीचे भान, कर्तव्य पालना विषयी तत्परता व विद्यार्थी हितासाठी सर्वतोपरी त्यागाची भावना येथील शिक्षकांमध्ये रुजलेली आहे. टीम वर्क कसे असते, याचा अभ्यास करायचा असेल तर अभ्यासकांनी श्री तिलोक परिवारामध्ये डोकून बघावे. सोशल मीडियामध्ये गुरफटत चाललेला विद्यार्थी, वर्गामध्ये शिक्षकाकडून शिकवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमा बरोबर मनाने किती वेळ गुंतून राहतो याला आता महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण भावनिक, बौद्धिक व मानसिक विकासासाठी शिक्षकांच्या बरोबरीने पालकांचे योगदान सुद्धा महत्त्वाचे आहे. विद्यार्थी शिक्षकांच्या हाती सोपवून आपली जबाबदारी संपली, हा काळ आता केव्हाच संपला आहे. गर्जे यांनी दैनंदिन लेखनाचा छंद सेवानिवृत्तीच्या अखेरच्या क्षणापर्यंत जपला. हाच छंद त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा ठरला. ग्रामीण भागाची पार्श्वभूमी असल्याने विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींविषयी सर्व बारकावे त्यांना माहीत होते. शांत स्वभाव,



■ छाया । अनिल खाटेर


सकारात्मक दृष्टी, मुद्देसूद मांडणी अशा विविध गुणांच्या जोरावर संस्थेतही त्यांनी स्वतःचे स्थान निर्माण केले. अजातशत्रू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची संस्थेला सतत उणीव भासणार आहे. अशा शिक्षकांची सर्वच क्षेत्रामध्ये उणीव भासत आहे. अशोक गर्जे यांनी आता मार्गदर्शकाची भूमिका बजवावी असे आवाहन गुगळे यांनी केले.

संस्थेतर्फे मान्यवरांनी गर्जे यांचा सपत्नीक सन्मान करत उर्वरित आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत गाडेकर यांनी केले. सूत्रसंचालन सुनील कटारिया तर आभार सुधाकर सातपुते यांनी मानले. बिपिन खंडागळे यांनी स्वरचित सादर केलेली कविता उपस्थित यांचे लक्ष वेधणारी ठरली.

# समाजहिताचा ध्यास घेणारे शांताराम (बापू) काळे

**पत्रकार व शिक्षणसेवक शांताराम (बापू) काळे यांचा आज ६१ वा वाढदिवस. त्या निमित्ताने त्यांचा जीवनपट उलगडताना विशेष आनंद होत आहे. काही व्यक्ती समाजासाठीच जन्म घेतात. असेच शिक्षण क्षेत्राच्या व पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न सोडविणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे शांताराम (बापू) काळे..!**



अकोले तालुक्यातील आदिवासी भागात गेली ४२ वर्षे पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे, तसेच गेली ३५ वर्षे श्री स्वामी समर्थ शिक्षण संस्थेच्या माध्यमातून उपेक्षित, गरीब व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली करणारे पत्रकार तथा शिक्षणसेवक शांताराम (बापू) काळे यांनी आज (ता. ५) वयाची ६० वर्षे पूर्ण करून ६१ व्या वर्षात पदार्पण केले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

राजूर येथील शिक्षक लक्ष्मण काळे गुरुजी व गंगुबाई काळे यांच्या कुटुंबात जन्मलेल्या शांताराम काळे यांचे बालपण अत्यंत संघर्षमय होते. पाच बहिणी व तीन भाऊ अशा मोठ्या कुटुंबाची जबाबदारी आणि मर्यादित आर्थिक परिस्थिती यामुळे इयत्ता सातवीपासूनच त्यांनी शिक्षणासोबत विविध कामे केली. दुष्काळी कामे, बाजारपेठ व यात्रांमध्ये किराणा मालाची विक्री, फोटो स्टुडिओतील काम, तसेच सायकलवर वृत्तपत्र वितरण अशी अनेक कामे करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. कोणतेही काम कमीपणाचे नसते, हा जीवनमंत्र त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून जपला.

त्यांची जिद्द व चिकाटी पाहून विमा विकास अधिकारी उत्तम जगधने यांनी त्यांना विमा प्रतिनिधी म्हणून संधी दिली. त्यातून आर्थिक स्थैर्य मिळाले. याच काळात वृत्तपत्र वितरणासोबत त्यांनी पत्रकारितेत प्रवेश केला आणि सामाजिक प्रश्नांवर सातत्याने लेखणी चालवण्यास सुरुवात केली.



**मा. शांताराम (बापू) काळे**
**वीरभूमी वाढदिवस विशेष**

गेल्या चार दशकांत शेतकरी, ऊसतोड कामगार, बीडी कामगार, शेतमजूर, शिक्षक, दूध उत्पादक, बेरोजगार युवक, महिला, सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना त्यांनी सातत्याने प्रसिद्धी दिली. चांगल्या कामांचे कौतुक करतानाच चुकीच्या प्रवृत्तींवरही परखड भाष्य केले. पत्रकारितेच्या प्रवासात अनेक संकटे, दबाव आणि विरोधाचा सामना करूनही त्यांनी सामाजिक बांधिलकीची भूमिका कायम ठेवली.

शिक्षण क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. श्री स्वामी समर्थ शिक्षण संस्थेच्या माध्यमातून १९९२ मध्ये मुलींसाठी स्वतंत्र विद्यालय सुरू करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. त्यानंतर इंग्रजी माध्यम शाळा, उच्च माध्यमिक विद्यालय, तसेच हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याशी असलेल्या मवेशी गावात विद्यालय सुरू करून दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. आज या संस्थेत ३६ कर्मचारी कार्यरत असून हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन विविध शासकीय, निमशासकीय व खासगी क्षेत्रात यशस्वी कारकीर्द घडवत आहेत.

सामाजिक संवेदनशीलतेतून त्यांनी अनेक गरजू कुटुंबांना मदतीचा हात मिळवून दिला. ठाकरवाडी येथील गतिमंद आदिवासी महिला बिट्टी व तिच्या मुलाच्या जीवनावर प्रकाशझोत टाकून समाजाचे लक्ष वेधले. बांगरवाडीतील वृद्ध महिलेला शासकीय पेन्शन मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला. कौठवाडी येथील वनिता भांगरे हिच्या शिक्षणासाठी केलेल्या वृत्तांकनामुळे राज्यभरातून मदतीचा ओघ आला. आज तिच्या कुटुंबाला घरकुल, पालकांना शासकीय पेन्शन मिळाली असून वनिताला मोफत नर्सिंग शिक्षणाची संधी मिळाली आहे. रतनवाडीतील फुले विकणारी सोनाली ही विद्यार्थिनीही त्यांच्या प्रयत्नांतून पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आली.

त्यांच्या कार्याचे माजी मंत्री मधुकर पिचड यांच्यासह अनेक मान्यवरांनी वेळोवेळी कौतुक केले आहे. कोणत्याही अडचणीत मदतीला धावून जाणे, हा त्यांचा स्वभाव असल्याचे सहकाऱ्यांचे मत आहे.

त्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात पत्नी तथा श्री स्वामी समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या मंजुषा काळे यांचीही मोलाची साथ लाभली आहे. दत्तक पालक योजनेद्वारे गरीब व आदिवासी मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

शांताराम (बापू) काळे यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त नगर जिल्हा तेली समाजासह विविध सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा देत त्यांच्या निरोगी, दीर्घायुषी व समाजोपयोगी कार्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या..!

■ शब्दांकन : **अनिल काळे**

SPOT NEWS


छाया । विजय उंडे

## सीएमआयएस नोंदणीत श्रीगोंदा पोलीस ठाणे जिल्ह्यात अव्वल; ७,७१९ आरोपींची नोंद

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

गुन्हेगार व आरोपींची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणाऱ्या सीएमआयएस (Criminal Monitoring Intelligence System) पोर्टलवर तब्बल ७,७१९ आरोपींची नोंदणी पूर्ण करून श्रीगोंदा पोलीस ठाण्याने अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. उचखड प्रणालीमुळे आरोपींवरील दाखल गुन्हे, प्रतिबंधक कारवाई, फरार व तडीपार आरोपींची माहिती तसेच अद्ययावत फोटो सहज उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे प्रभावी गस्त, आरोपींचा शोध आणि गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यास पोलिसांना मदत होणार आहे. ही कामगिरी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या देखरेखीखाली श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदारांनी पूर्ण केली. त्यांच्या या कामगिरीचे पोलीस प्रशासनाकडून कौतुक होत आहे.

## ॲड. ऐश्वर्या होले बी.ए. एलएलबी परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**अकोले । वीरभूमी–**



अकोले व संगमनेर येथील न्यायालयांमध्ये कार्यरत असलेले विधिज्ञ ॲड. हृषिकेश भास्कर होले यांच्या पत्नी ॲड. ऐश्वर्या होले या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मे २०२६ मध्ये घेतलेल्या बी.ए. एलएलबी परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कडा (ता. आष्टी, जि. बीड) येथे, तर महाविद्यालयीन शिक्षण सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर येथे झाले. बी.ए. एलएलबीचे शिक्षण त्यांनी पुणे येथील बालाजी लॉ कॉलेजमधून पूर्ण केले असून सध्या त्या एलएलएमचे शिक्षण घेत आहेत. ॲड. ऐश्वर्या यांच्या वडिलांचे नाव हनुमंत पांडुरंग गांजूरे असून ते कडा येथील विरेंद्र सीड्स अँड फर्टीलायझर्स या फर्मचे मालक आहेत. त्या राजूर (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथील ॲड. एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख प्रा. भास्कर रंगनाथ होले यांच्या सून आहेत. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# जिल्हा बँक निवडणुकीत अकोल्यात दिग्गजांची रणधुमाळी

### गायकर, लहामटे, पिचड यांच्यासह अनेक इच्छुक मैदानात । सोसायटी ठरावांमुळे राजकीय समीकरणांना वेग

**अकोले । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत अकोले तालुक्यात यंदा प्रथमच मोठी चुरस निर्माण झाली आहे. अनेक दिग्गज नेत्यांनी निवडणुकीसाठी कंबर कसल्याने आणि विविध सोसायट्यांमधून इच्छुकांचे ठराव झाल्याने तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

जिल्हा बँकेच्या राजकारणात अकोले तालुक्याला नेहमीच महत्त्वाचे स्थान राहिले आहे. दिवंगत भाऊसाहेब हांडे यांनी दीर्घकाळ संचालक व अध्यक्ष म्हणून काम पाहिले. त्यांच्या पश्चात माजी अध्यक्ष सिताराम पाटील गायकर गेली सुमारे २५ वर्षे संचालक म्हणून निवडून येत असून मागील निवडणुकीत त्यांची बिनविरोध निवड झाली होती. बदलत्या राजकीय समीकरणांमुळे यंदा त्यांच्या गटासमोर आव्हान उभे राहिले असले, तरी सोसायटी ठरावांमध्ये त्यांच्याच समर्थकांची संख्या सर्वाधिक असल्याचे बोलले जात आहे.




यंदाच्या निवडणुकीत आमदार डॉ. किरण लहामटे, माजी आमदार वैभवराव पिचड, माजी सभापती कैलासराव वाकचौरे, माजी संचालक अमित भांगरे, तज्ज्ञ संचालक मधुकरराव नवले यांचाही सक्रिय सहभाग दिसून येत आहे.

तांत्रिक कारणामुळे सिताराम पाटील गायकर यांना निवडणूक लढविता येणार नसली, तरी उंचखडक खुर्द सोसायटीतून त्यांची कन्या संजीवनी गोविंदराव शिंदे, तर मोगरा सोसायटीतून पत्नी भीमाबाई गायकर यांच्या नावाचे ठराव झाले आहेत. त्यामुळे गायकर गटाकडून या दोघींपैकी एक उमेदवार असण्याची शक्यता आहे.

आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या नावाचा कोथळे सोसायटीतून, माजी आमदार वैभवराव पिचड यांचा सुगाव बुद्रुक, अमित भांगरे यांचा शेंडी, मधुकरराव नवले यांचा अकोले, कैलासराव वाकचौरे यांचा कळस बुद्रुक, बाळासाहेब भोर यांचा धामणगाव आवारी, जयश्री नाईकवाडी यांचा गर्दनी, तर रावसाहेब वाकचौरे यांचा विरगाव सोसायटीतून ठराव झाला आहे. तसेच शरद चौधरी (आंभोळ) आणि सुरेश गडाख (कळस खुर्द) यांच्या नावांच्याही ठरावांची चर्चा आहे. काही इच्छुकांचे सोसायटी मतदारसंघाबरोबरच दूध प्रक्रिया व पतसंस्था मतदारसंघातूनही ठराव झाले आहेत.

अंतिम लढत कोणत्या दोन पॅनेलमध्ये होते, यावर तालुक्यातील राजकीय समीकरणे अवलंबून राहणार आहेत. सिताराम पाटील गायकर, वैभवराव पिचड व कैलासराव वाकचौरे हे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पॅनेलला पाठिंबा देण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तर आमदार डॉ. किरण लहामटे हे विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या आघाडीत सहभागी होण्याची चर्चा आहे. मधुकरराव नवले हे थोरात यांचे निष्ठावान समर्थक असल्याने ते त्यांच्याच गटात राहण्याची शक्यता आहे.

तालुक्यातील विविध नेत्यांचा सक्रिय सहभाग, सोसायटी ठरावांतील चुरस आणि महिला तसेच अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातील संभाव्य संधी यामुळे यंदाची जिल्हा बँक निवडणूक अकोले तालुक्यात विशेष लक्षवेधी ठरणार असल्याचे चित्र आहे.

## लाखेफळ ग्रामपंचायतीची गायरान जागा व विकासकामांना मंजुरीची ग्रामविकास मंत्र्यांकडे शरद सोनवणे यांची मागणी

### सार्वजनिक सुविधांसाठी जागा उपलब्ध करून देण्यासह ३६ लाखांच्या वस्ती सुधार योजनांना मंजुरीची अपेक्षा

**शेवगाव । वीरभूमी –**

शेवगाव तालुक्यातील लाखेफळ ग्रामपंचायतीने गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सार्वजनिक प्रयोजनासाठी गायरान जागा उपलब्ध करून देण्यासह वस्ती सुधार योजनेंतर्गत विविध विकासकामांना मंजुरी देण्याची मागणी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. पुणे येथे झालेल्या सरपंच महापरिषदेत हे निवेदन मंत्र्यांना प्रत्यक्ष सादर करण्यात आले.


छाया । अमोल कराळे

निवेदनात म्हटले आहे की, लाखेफळ हे पुनर्वसित गाव असून गावात सार्वजनिक मालकीची जागा उपलब्ध नाही. संपूर्ण गाव गायरान गट क्रमांक १२८ मध्ये वसले असल्याने ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, समाजमंदिर, सार्वजनिक शौचालय, स्मशानभूमी, क्रीडांगण, पाणीपुरवठा योजना तसेच प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांसाठी आवश्यक जागेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या ग्रामपंचायत कार्यालयही भाड्याच्या जागेत सुरू असून विकासकामे रखडली आहेत. त्यामुळे गायरान गट क्रमांक १२८ मधील जागा सार्वजनिक प्रयोजनासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय ग्रामपंचायतीच्या हद्दीतील खाडे, फुंदे, सोनावणे व घुंगासे वस्ती येथे वस्ती सुधार योजनेंतर्गत अद्याप कोणतीही कामे मंजूर झालेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या वाड्यांमध्ये वीजपुरवठा, अंतर्गत रस्ते आणि अतिरिक्त वीजपुरवठा आदी मूलभूत सुविधांसाठी सुमारे ३६ लाख रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्याची मागणी ग्रामपंचायतीने केली आहे.

ही कामे मंजूर झाल्यास वाड्या-वस्त्यांमधील मूलभूत सुविधांमध्ये वाढ होऊन विकासाला गती मिळेल, असा विश्वास ग्रामपंचायतीने व्यक्त केला आहे.

सरपंच महापरिषदेदरम्यान ग्रामपंचायतीच्या प्रतिनिधींनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन दोन्ही निवेदने सादर केली. मागण्यांबाबत सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन ग्रामविकास विभागाने दिल्याची माहिती सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष शरद सोनवणे यांनी दिली.

### व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या
## राज्य संयोजकपदी गोरक्ष नेहे; गायत्री ढवळे राज्य कोषाध्यक्ष




**श्रीगोंदा । वीरभूमी–**

पत्रकारांच्या हक्कांसाठी व सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या व्हाईस ऑफ मीडिया आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. संगमनेरचे ज्येष्ठ पत्रकार गोरक्ष नेहे यांची राज्य संयोजकपदी, तर श्रीगोंद्याच्या युवा महिला पत्रकार गायत्री ढवळे यांची राज्य कोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे व प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के यांनी या नियुक्त्या जाहीर केल्या.

गोरक्ष नेहे हे गेल्या दोन दशकांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून सामाजिक, कृषी, शैक्षणिक व जनहिताच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने निर्भीड पत्रकारिता केली आहे. व्हाईस ऑफ मीडियाचे अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी संघटन विस्तारात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. गायत्री ढवळे यांनीही पत्रकारिता तसेच संघटनेच्या विविध उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदविला असून महिला पत्रकारांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम केले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील दोन पत्रकारांना राज्य कार्यकारिणीत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मिळाल्याने जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्रात उत्साहाचे वातावरण असून, विविध स्तरांतून गोरक्ष नेहे व गायत्री ढवळे यांचे अभिनंदन होत आहे.

## किसान इंटरनॅशनल स्कूलमध्ये व्यसनमुक्तीची सामूहिक प्रतिज्ञा

### ‘दहा कोटी नशा मुक्ती प्रतिज्ञा महाअभियान’ अंतर्गत जनजागृती । विद्यार्थ्यांना मूल्याधिष्ठित जीवनाचा संदेश

**पारनेर । वीरभूमी–**

वाढती व्यसनाधीनता ही तरुण पिढी व समाजासमोरील गंभीर समस्या बनत असताना, त्याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने पारनेर येथील किसान इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या केंद्रातर्फे ‘दहा कोटी नशा मुक्ती प्रतिज्ञा महाअभियान’ अंतर्गत विशेष व्यसनमुक्ती प्रतिज्ञा व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.


छाया । भगवान गायकवाड

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसान इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे होते. ब्रह्माकुमारी साधना दीदी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमास रामभाई, पत्रकार भगवान गायकवाड यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सर्वांनी व्यसनमुक्त समाज घडविण्याची सामूहिक प्रतिज्ञा केली.

मार्गदर्शन करताना ब्रह्माकुमारी साधना दीदी म्हणाल्या की, वाढत्या व्यसनाधीनतेमुळे विद्यार्थी, युवक आणि समाजावर गंभीर परिणाम होत आहेत. लहानपणापासूनच विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांविषयी जागरूकता निर्माण करून मूल्याधिष्ठित जीवनशैलीचा स्वीकार व्हावा, या उद्देशाने हे देशव्यापी अभियान राबविण्यात येत आहे.

तणावातून मुक्त होण्यासाठी अनेकजण व्यसनांचा आधार घेतात; मात्र त्यामुळे समस्या कमी न होता अधिक वाढतात, असे त्यांनी सांगितले. अभियानांतर्गत देशभरातील सुमारे चार कोटी नागरिकांपर्यंत पोहोचण्यात आले असून, त्यापैकी तीन कोटींहून अधिक नागरिकांनी व्यसनमुक्त जीवन स्वीकारल्याचा दावा त्यांनी केला.

येत्या २५ ऑगस्ट रोजी मुख्य प्रशासिका दादी प्रकाशमणीजी यांच्या स्मृतीनिमित्त ‘नशा मुक्त भारत अभियान’ जनआंदोलन बनविण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी आयुष्यभर व्यसनमुक्त राहण्याची तसेच इतरांनाही व्यसनमुक्तीसाठी प्रेरित करण्याची सामूहिक शपथ घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थी व नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

## राजूरमध्ये प्रशांत देशमुख यांचे ‘जगणे सुंदर आहे’ विषयावर आज व्याख्यान

### मोफत नेत्रतपासणी शिबिर । नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**अकोले । वीरभूमी–**

विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचारांची जडणघडण व्हावी आणि नागरिकांना प्रेरणादायी जीवनमूल्यांचा संदेश मिळावा, या उद्देशाने राजूर येथे बुधवारी (ता. ५) सकाळी १० वाजता प्रसिद्ध इतिहासकार प्रशांत देशमुख यांचे ‘जगणे सुंदर आहे’ या विषयावरील प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. ही माहिती प्राचार्य सतीश काळे यांनी दिली.



राजूर येथील श्री स्वामी समर्थ शिक्षण संस्थेच्या बहुउद्देशीय सभागृहात हा कार्यक्रम होणार असून, स्वामी समर्थ अभ्यास केंद्र तसेच मोफत नेत्रदान जनजागृती व नेत्रतपासणी शिबिराच्या निमित्ताने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

इतिहास अभ्यासक म्हणून राज्यभर परिचित असलेले प्रशांत देशमुख यांनी सामाजिक, ऐतिहासिक आणि प्रेरणादायी विषयांवर अनेक व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि प्रभावी मांडणीतून विद्यार्थी, युवक, पालक आणि नागरिकांना सकारात्मक जीवनदृष्टीची प्रेरणा मिळणार असल्याने कार्यक्रमाबाबत उत्सुकता व्यक्त होत आहे.

या व्याख्यानासह मोफत नेत्रतपासणी शिबिर आणि स्वामी समर्थ अभ्यास केंद्राच्या उपक्रमांचा लाभ राजूर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत बांगर आणि राजूरचे सरपंच संतोष बनसोडे यांनी केले आहे.

# वाढदिवस दरवर्षी येईल... पण दादांचा तो सकाळचा फोन पुन्हा कधीच येणार नाही!

### स्व. अजितदादांच्या आठवणीने आमदार आशुतोष काळे गहिवरले । हजारो कार्यकर्त्यांसमोर व्यक्त केल्या मनातील भावना

**कोपरगाव । वीरभूमी –**

माझ्या प्रत्येक वाढदिवशी सकाळी साडेसहा वाजता अजितदादांचा शुभेच्छांचा फोन यायचाच. अनेक वर्षांची ती प्रेमाची परंपरा होती. पण यंदा तो फोन येणार नाही, ही जाणीव मनाला असह्य वेदना देणारी आहे. वाढदिवस दरवर्षी येईल, पण अजितदादा पुन्हा कधीच परत येणार नाहीत अशा शब्दांत आमदार आशुतोष काळे यांनी भावना व्यक्त करताच सभागृहातील वातावरण क्षणभर स्तब्ध झाले.

कोपरगाव येथील कृष्णाई बॅन्क्वेट हॉलमध्ये आमदार आशुतोष काळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित शुभेच्छा सोहळ्यासाठी कोपरगाव मतदारसंघातून हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली होती. शुभेच्छा स्वीकारण्यापूर्वी उपस्थितांशी संवाद साधताना स्व. अजितदादांच्या आठवणींनी आमदार काळे यांचा कंठ दाटून आला. यावर्षी वाढदिवस साजरा करण्याची मनापासून इच्छा नव्हती. आपल्या सर्वांचे लाडके नेते स्व. अजितदादा आपल्याला सोडून जाऊन सहा महिने झाले, पण मन अजूनही ते वास्तव स्वीकारू शकलेले नाही. आजही वाटते, दादा कुठेतरी भेटतील, पुन्हा एकदा प्रेमाने विचारपूस करतील. ही आशा मनातून जात नाही, असे ते भावूक स्वरात म्हणाले.

ते पुढे म्हणाले, कार्यकर्त्यांचा उत्साह, जनतेचे प्रेम आणि आशीर्वाद पाहता वाढदिवस साजरा करावा की नाही, अशा द्विधा मनःस्थितीत होतो. मात्र कार्यकर्त्यांच्या आग्रहाचा मान राखण्यासाठी आणि जनतेचे आशीर्वाद स्वीकारण्यासाठी अत्यंत साधेपणाने वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला. एका बाजूला जनतेचे अपार प्रेम आणि विश्वास आहे; पण दुसऱ्या बाजूला दादा नसल्याची पोकळी मनाला सतत अस्वस्थ करते. त्यांच्या शुभेच्छांशिवाय साजरा झालेला हा पहिला वाढदिवस आयुष्यभर वेदना देत राहील. आजही प्रत्येक क्षणी त्यांची आठवण येते, असे सांगताना त्यांचा आवाज भरून आला.


छाया । जनार्दन जगताप

स्व. अजितदादांच्या कार्याचा उल्लेख करताना आमदार काळे म्हणाले, दादांनी आम्हाला माणुसकीची वाट दाखवली. जनतेची सेवा हेच जीवनाचे ध्येय असल्याचे शिकवले. संकटांशी दोन हात करत खंबीरपणे पुढे कसे चालायचे, याची प्रेरणा दिली. आज ते आपल्यात नसले, तरी त्यांचे विचार, त्यांचे संस्कार आणि त्यांचे कार्य माझ्या प्रत्येक पावलावर मार्गदर्शक म्हणून राहणार असल्याचे त्यानी सांगितले. यावेळी हजारो कार्यकर्त्यांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

### दादांशिवायचा पहिला वाढदिवस...

अजितदादांच्या शुभेच्छामुळे वाढदिवसाचा आनंद द्विगुणीत होत होता परंतु हा दादांशिवायचा पहिला वाढदिवस असल्याचे सांगतांच स्व. अजितदादांच्या आठवणीने आमदार आशुतोष काळे यांचा कंठ दाटून आला. वाढदिवस दरवर्षी येईल, पण अजितदादा परत येणार नाहीत, आणि अजितदादांसारखा माणूस पुन्हा होणार नाही. या शब्दांनी उपस्थितांचे डोळे पाणावले आणि उपस्थित हजारो कार्यकर्ते आणि नागरिक देखील भावूक झाले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# घोगरगावचे पोलीस पाटील सुदाम बोरुडे निलंबित

## प्रांताधिकाऱ्यांची मोठी कारवाई । 'वीरभूमी'च्या वृत्ताची दखल; पोलीस विभागाच्या अहवालानंतर प्रशासनाचा निर्णय

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

तालुक्यातील घोगरगाव येथील पोलीस पाटील सुदाम बोरुडे यांच्यावर श्रीगोंदा-पारनेर उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांनी निलंबनाची कारवाई केली आहे. त्यांच्या कामकाजासंदर्भात पोलीस विभागाकडून प्राप्त झालेला अहवाल, उपलब्ध नोंदी आणि संबंधितांचा खुलासा यांची पडताळणी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

प्रशासनाच्या आदेशानुसार, पोलीस पाटील म्हणून गावातील कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हे, अपघात, भांडणे तसेच इतर घटनांची माहिती तातडीने पोलीस प्रशासनाला देणे आणि पोलीस विभागाला आवश्यक सहकार्य करणे ही त्यांची जबाबदारी आहे. मात्र, या कर्तव्यांमध्ये गंभीर त्रुटी आढळल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

विविध घटनांची माहिती वेळेवर पोलीस प्रशासनाला न देणे, पोलीस विभागाला अपेक्षित सहकार्य न करणे, ग्रामसुरक्षा दलाच्या कामात निष्क्रियता तसेच शासकीय कर्तव्याकडे दुर्लक्ष केल्याचे निरीक्षण अहवालात नोंदविण्यात आले आहे. तसेच एका प्रकरणात सादर केलेल्या खुलाशात विसंगती आढळल्याचेही आदेशात नमूद आहे.





घोगरगाव पोलीस पाटील प्रकरण तापले : बडतर्फीची मागणी, कसुरी अहवालानंतर कारवाईकडे लक्ष

● श्रीगोंदा । वीरभूमी –

– प्रशांत भोस,

सामाजिक कार्यकर्ते प्रशांत भोस यांनी यापूर्वी सुदाम बोरुडे यांच्या कामकाजाबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. या तक्रारीसंदर्भातील वृत्त 'दैनिक वीरभूमी'ने प्रसिद्ध करून प्रकरणाला वाचा फोडली होती. त्यानंतर पोलीस विभागाच्या अहवालाच्या आधारे प्रशासनाने चौकशी करून ही कारवाई केली आहे.

महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, १९६७ मधील तरतुदींनुसार पोलीस पाटील पदावरील व्यक्तीने कर्तव्यदक्ष, जबाबदार व निष्पक्षपणे काम करणे अपेक्षित आहे. संबंधित प्रकरणात या जबाबदाऱ्यांचे समाधानकारक पालन झाले नसल्याचा निष्कर्ष प्रशासनाने नोंदविला आहे. या कारवाईमुळे घोगरगाव परिसरात चर्चा सुरू असून, शासकीय पदावरील कर्तव्य बजावताना हलगर्जीपणा झाल्यास प्रशासनाकडून कारवाई केली जाऊ शकते, असा संदेश या कारवाईतून मिळाला आहे.

## लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या पदग्रहण सोहळ्यात सेवाभावाचा संकल्प

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

समाजातील गरजू, वंचित आणि संकटग्रस्त घटकांना आधार देण्याचे कार्य लायन्स क्लब सातत्याने करत असून, कोणतेही संकट आले तरी लायन्स व लिओ क्लब ऑफ अहमदनगरने आपल्या सामाजिक बांधिलकीची प्रचिती दिली आहे. कोरोनाकाळात सुरू करण्यात आलेली लंगर सेवा आजही अविरत सुरू असून, या उपक्रमाने देशासह परदेशातील लायन्स संघटनांचेही लक्ष वेधून घेतले आहे. त्याचबरोबर लिओ क्लबच्या माध्यमातून युवक-युवती मोठ्या संख्येने सामाजिक चळवळीशी जोडले जात असल्याचे प्रतिपादन पदग्रहण अधिकारी प्रविण गुलाटी यांनी केले.

अहिल्यानगर शहरातील लायन्स क्लब ऑफ अहमदनगर आणि लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पदग्रहण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यास रिजन चेअरमन संदीप गोंदकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी लायन्सचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच सामाजिक कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सोहळ्यात लायन्स क्लबच्या अध्यक्षपदाची धुरा हरजितसिंग वधवा यांनी स्वीकारली. सचिवपदी हरिष हरवानी तर खजिनदारपदी विजय कुलकर्णी यांनी पदभार स्वीकारला. मावळते अध्यक्ष डॉ. संजय असनानी, सचिव प्रशांत मुनोत आणि खजिनदार दिलीप कुलकर्णी यांनी नूतन पदाधिकाऱ्यांकडे पदभार सोपविला. तसेच लिओ क्लब ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षपदी हर्षवर्धन किथानी, सचिवपदी रित जाजू यांनी पदभार स्वीकारला.

# रांजणखळगे मार्गाची दुरवस्था; रस्ता तातडीने दुरुस्त करा

## पर्यटक, भाविक व ग्रामस्थांचे खा. नीलेश लंके, आ. काशिनाथ दाते यांना साकडे

**● निघोज । वीरभूमी –**

राज्याचा अनमोल नैसर्गिक वारसा असलेल्या जगप्रसिद्ध रांजणखळगे (कुंड) पर्यटनस्थळाकडे जाणाऱ्या निघोज एसटी बसस्थानक ते रांजणखळगे या सुमारे चार किलोमीटर रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे पर्यटक, भाविक, शेतकरी, विद्यार्थी आणि प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असून हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची मागणी होत आहे.

गेल्या आठ वर्षांपूर्वी तत्कालीन आमदार विजय औटी यांच्या माध्यमातून या रस्त्याचे काम करण्यात आले होते. मात्र वाढती जड वाहतूक आणि मुसळधार पावसामुळे रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. मळगंगा देवीच्या दर्शनासाठी येणारे भाविक, रांजणखळगे पाहण्यासाठी येणारे पर्यटक तसेच निघोज-टाकळी हाजी-रांजणगाव मार्गे पुण्याकडे जाणारे हजारो प्रवासी या रस्त्याचा वापर करतात.


■ छाया । दत्ता उनवणे

रस्त्याच्या दुरवस्थेबाबत अजय शेळके, मेजर विकास वराळ आणि सामाजिक कार्यकर्ते नाना वराळ यांनी सोशल मीडियावर छायाचित्रांसह पोस्ट करून लक्ष वेधले आहे. यानंतर नागरिकांनीही लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे.

रांजणखळगे परिसरात मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, निघोज ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ आणि भाविकांच्या लोकसहभागातून विविध विकासकामे सुरू आहेत. खासदार नीलेश लंके यांच्या प्रयत्नातून सुमारे साडेपाच कोटी रुपयांच्या निधीतून पर्यटक निवास व भोजन कक्षाचे काम पूर्ण झाले आहे. मात्र पर्यटनविकासाला चालना देणारा मुख्य रस्ताच खराब असल्याने पर्यटकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पर्यटनस्थळ, मळगंगा तीर्थक्षेत्र आणि पुण्याकडे जाणारा कमी अंतराचा मार्ग म्हणून या रस्त्याला मोठे महत्त्व आहे. त्यामुळे केंद्र किंवा राज्य शासनाच्या माध्यमातून किमान १० ते १२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दर्जेदार आणि टिकाऊ रस्ता उभारावा, अशी मागणी ग्रामस्थ, पर्यटक आणि भाविकांकडून करण्यात येत आहे.

### रस्त्याच्या रुंदीकरणाचीही गरज

■ रांजणखळगे पर्यटनस्थळ, मळगंगा तीर्थक्षेत्र तसेच पुण्याकडे जाणारा महत्त्वाचा मार्ग असल्याने या रस्त्यावर दररोज हजारो दुचाकी, चारचाकी तसेच कांदा, दूध व भाजीपाला वाहतूक करणारी जड वाहने धावतात. त्यामुळे रस्त्याचे मजबुतीकरण करताना दोन्ही बाजूंनी रुंदीकरण, पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी गटारी आणि प्रवाशांसाठी स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी भाविक, पर्यटक आणि ग्रामस्थांनी केली आहे.

# शहरात चारचाकी अडवून युवकाला जबरदस्तीने नेल्याची घटना; 'अपहरण' की आर्थिक वाद

## सीसीटीव्ही तपासणीची मागणी । पोलिसांकडून 'सहमतीने नेले' असल्याचा दावा

**● शेवगाव । वीरभूमी –**

शेवगाव-पाथर्डी मार्गावरील लकी हॉटेल व जे. मो. गुगळे दालनासमोर भररस्त्यात एका चारचाकी वाहनाला अडवून चालकाला वाहनाच्या चावीसह दुसऱ्या वाहनातून घेऊन गेल्याची घटना सोमवारी (दि. ३) रात्री सुमारे ९ वाजता घडली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली. मात्र दुसऱ्या दिवसापर्यंत या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात कोणताही गुन्हा दाखल न झाल्याने नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संभाजीनगर येथील चार मित्र पाथर्डी येथे चारचाकी वाहन खरेदीसाठी आले होते. एमएच-०२ बीआर-७३५७ क्रमांकाचे वाहन खरेदी करून ते संभाजीनगरकडे निघाले असता, शेवगावातील लकी हॉटेल परिसरात मागून आलेल्या विनाक्रमांकाच्या चारचाकी वाहनाने त्यांचा रस्ता अडविला. त्यानंतर एका व्यक्तीने चालकाला धमकावत वाहनाची चावी घेतली आणि त्याला दुसऱ्या वाहनात बसवून पाथर्डीच्या दिशेने नेल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.


■ छाया । अमोल कराळे

घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी शेवगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. दोन पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी संबंधित वाहनातील एक व्यक्ती तसेच दुसऱ्या वाहनातील दोघांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात नेले. मात्र अधिकृत तक्रार दाखल न झाल्याने गुन्हा नोंदविण्यात आला नाही.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, सुयोग महाले हा युवक काही वर्षांपूर्वी पाथर्डी येथे राहत होता व सध्या संभाजीनगर येथे वास्तव्यास आहे. त्याने पाथर्डीतील काही मित्रांकडून उसने पैसे घेतले होते. त्या रकमेच्या वसुलीसाठी संबंधित मित्रांनी त्याला त्याच्या संमतीने सोबत नेले. उसने घेतलेली रक्कम परत केल्यानंतर त्याला सोडून देण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच या घटनेत कोणत्याही शस्त्राचा वापर झालेला नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

> मी सुट्टीवर असल्यामुळे ही घटना माझ्या निदर्शनास आलेली नाही. संपूर्ण प्रकरणाची शहानिशा करून आवश्यक ती माहिती घेण्यात येईल.
>
> **– मोहन बोरसे,** पोलीस निरीक्षक, शेवगाव

मात्र प्रत्यक्षदर्शींनी भररस्त्यात वाहन अडवून युवकाला जबरदस्तीने घेऊन जात असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून वस्तुस्थिती स्पष्ट करावी आणि गंभीर स्वरूपाच्या या घटनेची सखोल चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जलसंपदा मंत्री विखे पाटील ५ ऑगस्टला घेणार कुकडी व सीना प्रकल्पाचा आढावा

### शेतकऱ्यांशी संवाद आणि कामांची करणार पाहाणी

**● कर्जत । वीरभूमी–**

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कुकडी व सीना प्रकल्प लाभक्षेत्रातील विविध विकास कामांचा आढावा घेण्यासाठी बुधवार, दिनांक ५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता कर्जत येथील कुळधरण रोडवरील शिवपार्वती मंगल कार्यालयात महत्त्वपूर्ण आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीस कुकडी व सीना प्रकल्प लाभक्षेत्रातील शेतकरी, कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, प्रकल्पाशी संबंधित विविध प्रश्न, सिंचन व्यवस्था, कालव्यांची दुरुस्ती तसेच लाभक्षेत्रातील विकास कामांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.



यापूर्वी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील सकाळी ९.३० वाजता राशीन येथील श्री जगदंबा देवी मंदिरात दर्शन घेणार आहेत. त्यानंतर होलेवाडी, चिलवडी आणि कोळवाडी परिसरात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कालव्यांच्या दुरुस्तीच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. या भेटी दरम्यान शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यावर आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा होणार आहे.

तसेच सकाळी ११.३० वाजता कर्जत येथे जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीस प्रशासकीय मान्यता मिळाल्याबद्दल बार कौन्सिलच्या वतीने ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचा सत्कार करण्यात येणार आहे. त्यानंतर ते कर्जत येथील ग्रामदैवत श्री संत सद्गुरू गोदड महाराज यांच्या समाधीस्थळी दर्शन घेतील.

यानंतर शिवपार्वती मंगल कार्यालयात आयोजित कुकडी व सीना प्रकल्पाच्या आढावा बैठकीत सिंचन, कालवा दुरुस्ती, पाणी वितरण, प्रलंबित कामे आणि शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा होणार आहे. या बैठकीस प्रकल्प लाभक्षेत्रातील सर्व शेतकरी, कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'झाम्या' बालनाट्याला शेवगावात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## मोबाईलच्या अतिरेकी वापरावर भाष्य । 'मित्रच खरे'चा प्रभावी संदेश

**● शेवगाव । वीरभूमी –**

मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे बालमनावर होणारे दुष्परिणाम आणि प्रत्यक्ष मैत्रीचे महत्त्व प्रभावीपणे मांडणाऱ्या 'झाम्या' या बालनाट्याला शेवगावात विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूल आणि आबासाहेब काकडे हायस्कूलमधील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी या नाट्यप्रयोगाचा आनंद घेतला.

बालकुमारांसाठी प्रकाशित होणाऱ्या 'कुल्फी' मासिकाच्या पुढाकारातून या विशेष प्रयोगांचे आयोजन करण्यात आले होते. हर्षल कोराळे आणि हृषीकेश दाभोलकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमात प्रसाद कुमठेकर लिखित व महेश खंदारे दिग्दर्शित नाटकाने विद्यार्थ्यांची मने जिंकली.

अत्यल्प नेपथ्य, कमी खर्च आणि मर्यादित जागेत सादर करण्यात आलेल्या या नाटकातून मोबाईलच्या आहारी गेलेल्या पिढीसमोर प्रत्यक्ष संवाद, मैत्री आणि सामाजिक नातेसंबंधांचे महत्त्व हृदयस्पर्शी पद्धतीने मांडण्यात आले.


■ छाया । अमोल कराळे

कृतार्थ शेवगावकर आणि निखील पुजारी यांनी आपल्या सहजसुंदर अभिनयाने सुमारे तासभर विद्यार्थ्यांना खिळवून ठेवले. विनोदी प्रसंग, प्रभावी संवाद आणि आशयपूर्ण सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात नाटकाला भरभरून दाद दिली. 'मोबाईलपेक्षा मित्र महत्त्वाचे' हा संदेश विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्यात कलाकारांना यश आले.

भाग्यश्री पवार यांची वेशभूषा प्रयोगाचे आणखी एक आकर्षण ठरली. पात्रांना साजेशी वेशभूषा आणि प्रभावी सादरीकरणामुळे नाटकाची रंगत अधिक वाढली.

यावेळी प्रा. रमेश भारदे, हरीश भारदे, प्राचार्य संजय कुलकर्णी, प्राचार्य लक्ष्मण बिटाळ, अनिल मगर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नाट्य परिषदेच्या शेवगाव शाखेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दरम्यान, मंगळवारी (ता. ४) शेवगाव शहरात या बालनाट्याचे आणखी दोन प्रयोग आयोजित करण्यात आले असून त्यांनाही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा नाट्य परिषदेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

## पद्मशाली महिला बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्याचा संकल्प

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

पद्मशाली समाजातील महिलांना शासकीय योजनांची माहिती, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने नव्याने स्थापन झालेल्या पद्मशाली महिला सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या पदग्रहण व नोंदणी प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला. दिल्लीगेट येथील संपर्क कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात समाजातील ज्येष्ठ महिला, माजी नगरसेविका आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मशाली समाजाच्या प्रथम महिला नगरसेविका तथा ९४ वर्षीय ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती सखुबाई संदुपटला या होत्या. प्रारंभी समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय महामुनी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



■ छाया । जनार्दन जगताप

# येणारा काळ नवोदित अभियंत्यांसाठी सुवर्णसंधीचा

## तहसीलदार महेश सावंत । संजीवनी पॉलीटेक्निकमध्ये नवागतांचे स्वागत

**● कोपरगाव । वीरभूमी –**

अहिल्यानगरसह शेजारील जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्यांची उभारणी होत असल्याने येणारा काळ नवोदित अभियंत्यांसाठी रोजगाराच्या दृष्टीने अत्यंत आशादायी ठरणार आहे. मात्र विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना अपयशासाठी इतरांना जबाबदार न धरता आत्मपरीक्षण करून स्वतःमध्ये सुधारणा करण्यावर भर द्यावा. तसेच जीवनात यशस्वी होण्यासाठी आचार्य चाणक्य यांच्या पंचसूत्रांचा अंगीकार करून शिस्त, संयम, परिश्रम आणि योग्य निर्णय क्षमतेच्या बळावर करिअर घडवावे, असे प्रतिपादन तहसीलदार श्री. महेश सावंत यांनी केले.

संजीवनी के.बी.पी. पॉलीटेक्नकच्या प्रथम व थेट द्वीतिय वर्षाच्या नवागतांचे स्वागत 'संजीवनी तंत्रआरंभ' या कार्यक्रमाने झाला. या कार्यक्रमात श्री सावंत यांनी प्रमुख पाहुणे म्हणुन विद्यार्थ्यांना मार्दर्शन केले. संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट तथा संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविले. यावेळी सर्कल ऑफिसर मच्छिंद्र पोकळे, प्राचार्य ए. आर. मिरीकर यांचेसह सर्व विभाग प्रमुख व डीन्स मंचावर उपस्थित होते. प्राचार्य मिरीकर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून संजीवनी पॉलीटेक्निकने स्थापित केलेल्या कीर्तिमानांची माहिती दिली.

श्री. सावंत पुढे म्हणाले की, रामायणात संजीवनी वनस्पतीचे जसे महत्त्व आहे, तसेच पुढील तीन-चार वर्षे ही शिक्षण संस्था तुमच्या आयुष्याला नवी दिशा देणारी, नवसंजीवनी आणि उर्जा देणारी ठरणार आहे. ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांनी कोणताही न्यूनगंड बाळगू नये. संसाधनं कमी असली तरी जिद्द, सातत्य आणि मेहनतीच्या जोरावर मोठे यश मिळविता येते.

अध्यक्षस्थानावरून बोलताना श्री अमित कोल्हे म्हणाले की, दर्जा आणि गुणवत्तेशी कधीही तडजोड करायची नाही, ही संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांची दूरदृष्टी होती. हाच विचार अध्यक्ष नितीनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली अखंडपणे जोपासला जात आहे. ते पुढे म्हणाले की, तुमची खरी स्पर्धा इतरांशी नसून स्वतःशी आहे. त्यामुळे दररोज स्वतःला अधिक सक्षम बनवा. प्राध्यापक सांगतील ती प्रत्येक गोष्ट गांभीर्याने करा. असामान्य व्यक्ती वेगळे काही करत नाही, तर प्रत्येक काम उत्कृष्टतेने आणि सातत्याने करते. म्हणून कौशल्य, सातत्य आणि जिज्ञासू वृत्ती जोपासा. संजीवनीमध्ये केवळ शैक्षणिक गुणवत्तेलाच नव्हे, तर विध्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासालाही प्राधान्य दिले जाते. विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्या. लिंक्डइन सारख्या प्लॅटफॉर्मवर नेटवर्क तयार करा. संजीवनीचे ३३ हजारांहून अधिक माजी विद्यार्थी ही संस्थेची मोठी ताकद आहे. अनेक माजी विद्यार्थी नामांकित संस्थांमध्ये उच्च पदांवर कार्यरत असून अनेक यशस्वी उद्योजक आहेत. त्यांच्याशी संपर्क ठेवा, त्यांच्याकडून प्रेरणा घ्या आणि उद्योगक्षेत्रासाठी स्वतःला तयार करा.. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न देशासमोर ठेवले आहे. त्या स्वप्नपूर्तीच्या संक्रमण काळात तुम्ही शिक्षण घेत आहात. त्यामुळे केवळ पदवी मिळवणे नव्हे, तर कौशल्य, नवोपक्रम, संशोधन आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय साधून विकसित भारताचे सक्षम शिल्पकार बनण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे.

प्रा. आय. के. सय्यद यांनी सुत्रसंचालन केले तर डॉ. एस. एम. सोनवणे यांनी आभार मानले.